# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date – 19 May 2022

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ मे २०२२ सायंकाळी ६.१०**

****

- यंदा चांगल्या पावसाची अपेक्षा असून, कृषी विभागाकडून खरीप हंगामाचं उत्तम नियोजन - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे
- ओबीसी आरक्षणासंदर्भात राज्य सरकार जूनमध्ये बाठिया समितीचा अहवाल आल्यानंतर आपलं म्हणणं न्यायालयात मांडणार असल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती
- कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राचं शिष्टमंडळ रवाना
- मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षभरात नऊ हजार ग्राहकांकडून १३ कोटी रूपयांची वीज चोरी उघड

आणि

- औरंगाबाद महानगरपालिकेत कंत्राटी पदभरतीसाठीच्या निविदेस मंजुरी देतांना कंत्राटदारांकडून कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणुक होणार नाही याची खबरदारी घ्यावी - खासदार इम्तियाज जलिल यांची सूचना

****

यंदा चांगल्या पावसाची अपेक्षा असून, कृषी विभागानं उत्तम नियोजन केलं आहे, त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम यशस्वी होईल, असा विश्वास, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे. खरीप हंगाम २०२२ आढावा बैठकीत ते आज बोलत होते. आरोग्यासाठी पोषक गुणधर्म असणारे बियाणे शेतकरी बांधवाना मोफत देणारं, त्यांच्या आरोग्याचा विचार करणारं महाराष्ट्र, देशातलं पहिलं राज्य असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतीला आधुनिकतेची जोड द्यावी, रोग, किडीचा प्रादुर्भाव रोखण्याबरोबर, अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी यंत्रणेनं सतर्क रहावं, विकेल ते पिकेल अभियान यशस्वी करण्यासाठी शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करावं, आदी सूचना, मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला यावेळी केल्या.

यंदाच्या खरीप हंगामासाठी १७ पूर्णांक ९५ लाख क्विंटल बियाणं आवश्यक असून, महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ आणि खासगी संस्थेकडे मिळून, १९ पूर्णांक ८८ लाख क्विंटल बियाणं अपेक्षित आहे, अशी माहिती कृषीमंत्री दादा भुसे यांनी या बैठकीत दिली.

दरम्यान, राज्यात पाच जूनला तळ कोकणात मान्सून दाखल होईल असा अंदाज, भारतीय हवामान विभागाचे कृष्णानंद होसाळीकर यांनी या बैठकीत वर्तवला आहे.

मराठवाड्यात यंदा सामान्यपेक्षा जास्त पाऊस होईल, तसंच एकूणच महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडेल, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

इतर मागास प्रवर्ग – ओबीसी आरक्षणासंदर्भात बाठिया समितीचा अहवाल आला की मध्य प्रदेश सरकार जसं सर्वोच्च न्यायालयात गेलं, तसं राज्य सरकारही जूनमध्ये बाठिया समितीचा अहवाल आल्यानंतर, आपलं म्हणणं न्यायालयात मांडेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. मध्य प्रदेशच्या धरतीवर महाराष्ट्रातही ५० टक्क्यांच्या पुढे जागा न जाऊ देता ओबीसींना प्रतिनिधित्व मिळावं, असा सरकारचा प्रयत्न राहील, त्यानुसार कामाला सुरुवात केली असल्याचं ते म्हणाले.

****

भारतातली माध्यमं आणि मनोरंजन कार्यक्षेत्र, वर्षाला ५३ अब्ज डॉलर्सची उलाढाल करण्याची अपेक्षा असून, सरकारची धोरणं या उद्योगाला चालना देणारी असल्याचं, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकुर यांनी म्हटलं आहे. फ्रान्समध्ये आयोजित कान्स चित्रपट महोत्सवात, इंडिया: द कंटेट हब ऑफ द वर्ल्ड' या चर्चासत्रात ते आज बोलत होते. भारताची कथा अतिशय सुंदर पद्धतीने मांडण्यात सिनेमाची महत्वाची भुमिका असल्याचं ते म्हणाले. भारत सरकारनं ॲनिमेशन, व्हिजुअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स कृती दलाची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतला असून, डिजिटायझेशनच्या माध्यमातून सिनेमाचा वारसा जपण्यासाठी, अनेक पावलं उचलण्यात आली असल्याचं, ठाकूर यांनी सांगितलं.

दरम्यान, कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्राचं शिष्टमंडळ रवाना झालं आहे. या शिष्टमंडळात सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव  सौरभ विजय, दादासाहेब फाळके चित्रनगरीचे महाव्यवस्थपकीय संचालक विवेक भिमनवार, तसंच या महोत्सवासाठी निवड करण्यात आलेल्या ‘कारखानीसांची वारी’, ‘पोटरा’ आणि ‘तिचं शहर होणं’ या मराठी चित्रपटांचे निर्माते, दिग्दर्शक यांचा समावेश आहे.

****

मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षभरात नऊ हजार ग्राहकांकडून १३ कोटी रूपयांची वीज चोरी उघड झाली आहे. त्यांच्याकडून चार कोटी ६१ लाख रूपये दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती, महावितरणच्या औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाच्या वतीनं देण्यात आली आहे. वीज चोरांविरूद्धच्या या धडक मोहीमेत संशयीत वीज मिटरच्या तपासणीसह, धाडी टाकून वीज चोऱ्या पकडण्यात आल्या. वीज चोरी पकडण्याची मोहीम यापुढेही चालू राहणार आहे. कोणीही आकडे टाकून विजेचा वापर करू नये, मिटरमध्ये छेडछाड करू नये, मंजूर भारापेक्षा अधिक भारानं विजेचा वापर करू नये, असं आवाहन महावितरण औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ मंगेश गोंदावले यांनी केलं आहे.

दरम्यान, महावितरणनं विलासराव देशमुख अभय योजनेच्या माध्यमातून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकांसाठी, व्याज आणि विलंब आकारात शंभर

टक्के माफीची सोय करून पुनर्जोडणीची संधी उपलब्ध करून दिली आहे. सर्व पात्र ग्राहकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन मुख्य अभियंता भुजंग खंदारे यांनी केलं आहे.

****

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध विभाग आणि अधिनस्त वार्ड कार्यालयात, कुशल आणि अकुशल कंत्राटी तत्वावर मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी, विविध कंत्राटदारांकडून आलेल्या निविदेस मंजुरी देतांना, कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणुक होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशी सूचना, खासदार इम्तियाज जलिल यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महानगरपालिकेचे प्रशासक, कामगार उपायुक्त, भविष्य निर्वाह निधी आयुक्त आणि कर्मचारी राज्य विमा विभागाच्या आयुक्तांना पत्र लिहिलं आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना विविध कामगार कायद्याप्रमाणे किमान वेतन आणि भत्ते, महगाई, घरभाडे यासह इतर भत्ते, भविष्य निर्वाह निधी, तसंच सुट्यांच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला वेळेवर देण्याचे आदेश, नियुक्त करण्यात येणाऱ्या कंत्राटदाराला द्यावे, असंही खासदार जलिल यांनी या पत्रात म्हटलं आहे.

****

सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी राज्याचा वाटा द्यावा, अशी सूचना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्राद्वारे केली आहे. तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी वैष्णव यांची दिल्लीत भेट घेवून सोलापूर - तुळजापूर - उस्मानाबाद हा रेल्वे मार्ग राज्याकडून निधीची तरतूद होत नसल्याने रेंगाळत असल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं, त्या अनुषंगाने रेल्वे मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे.

दरम्यान, औरंगाबादमध्ये १६ डब्यांची पिटलाइन मंजूर केल्याबद्दल भाजपाच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांनी, रेल्वे मंत्री वैष्णव यांची नवी दिल्लीत भेट घेवून, त्यांचे आभार मानले.

****

कला संचालनालयातर्फे घेण्यात आलेल्या एलिमेन्टरी परिक्षेचा निकाल २३ मे रोजी, तर इंटरमिजिएट परिक्षेचा निकाल २० मे रोजी जाहीर होणार आहे. डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट डी ओ ए डॉट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर हा निकाल जाहीर केला जाणार असल्याचं, संचालनालयानं कळवलं आहे.

****

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणं आवश्यक असून, यासाठी कायद्याचा धाक असला पाहिजे आणि प्रशासन दक्ष असलं पाहिजे, असं राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगीता चव्हाण यांनी म्हटलं आहे. हिंगोली इथं आढावा बैठकीत त्या आज बोलत होत्या. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचं संरक्षण करण्यासाठी हुंडाबळी अभियानावर जनजागृती करावी, बालविवाह रोखण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहभागी करुन घ्यावं, बालविवाह थांबवण्यासाठी कोणत्या पद्धतीने जनजागृती अभियान राबवत आहे, याचा अहवाल द्यावा, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकार्यांना यावेळी केल्या. बालविवाह करणाऱ्या

कुटुंबाचं समुदपदेशन करुन ते थांबवावेत, यात कसूर करणाऱ्या सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, भटजी यांच्यावर गुन्हे दाखल करावे, असं चव्हाण यांनी सांगितलं.

****

इतर मागास प्रवर्ग – ओबीसींचं राजकीय आरक्षण टिकवा, अन्यथा ओबीसी नेते, मंत्री, आमदार, खासदार यांना राज्यात रस्त्यावर फिरु देणार नसल्याचा इशारा, ओबीसी व्हीजेएनटी जनमोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी दिला आहे. ते आज औरंगाबाद इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. येत्या एक जूनला औरंगाबाद शहरातल्या क्रांती चौक ते विभागीय आयुक्त कार्यालय असा विराट मोर्चा काढण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

ओबीसी आरक्षण प्रकरणी महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या संतप्त कार्यकर्त्यांनी आज परभणी ते गंगाखेड मार्गावर नृसिंह पोखर्णी फाट्यावर रास्तारोको आंदोलन केलं. या आंदोलनामुळे या मार्गावरची वाहतूक ठप्प झाली होती.

****

औरंगाबाद इथल्या ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयात जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक आज पार पडली. अंमली पदार्थांसंदर्भात झालेल्या कारवाईचा आणि अंमली पदार्थांना आळा घालण्यासाठी यावेळी आढावा घेण्यात आला.

****